नि.दि.दावा क्र. ०७/२०१९
अनुसया वि. शासन
**प्रतिवादी क्र. ५ तर्फे सा.क्र.६**
**(नि.क्र.१६३)**

**//४//**

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.डी.एस.साबने वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**०६.** मी ४ थी पर्यंत मोरेवाडीमध्ये शिकलो आहे. माझी शाळा जिल्हापरिषदेची आहे. जनाबाई आणि मी एकाच वाडयातील आहोत. हे खरे की, आम्हाला बाजार करावयाचा झाल्यास शिरुर ताजबंद ही जवळची बाजारपेठ आहे. खरबवाडीमध्ये बाजार भरत नाही. हे खरे की, खरबवाडी येथे बाजारासाठी जाण्याची गरज पडत नाही. जनाबाईची जमीन माझ्या वडिलांनी खरेदी घेतली आहे. जनाबाईचे वय ७९ वर्षाच्या पुढे आहे असे दाखवणारा शाळा सोडल्याचा दाखला मी पाहिलेला नाही. हे खरे नाही की, एखाद्या व्यक्तीकडे पाहिल्यावर त्याचे वय किती आहे, हे सांगावयाचे ज्ञान मला नाही. हे खरे की, त्याबाबतचे माझे शिक्षण नाही. तिचे वय ७९ वर्षे आहे, हे मला त्याच वाडयातील असल्याने माहित आहे. जनाबाई हिचा जन्म माझ्या आधीचा आहे, त्यामुळे तो पाहण्याचा संबंध नाही. हे खरे नाही की, त्यामुळे दुसऱ्याच्या सांगण्यावरुन जनाबाईचे वय ७९ वर्षाच्या पुढे आहे असे मी सांगतो. हे खरे ती १९४८ साली जन्माला आली, हे मी पाहिले नाही. मी सांगतो की, मी तसे ऐकले आहे. हे खरे नाही की, १९६५ साली जनाबाईचा विवाह झाला असे मी खोटे सांगतो. १९७२ साली अनुसयाबाईसोबत मोहनराव यांचा विवाह झाला, याबद्दल मला माहिती नाही. १९६५ साली माझे जनाबाईच्या घरी जाणे झालेले नाही, हे म्हणणे खरे आहे. हे खरे नाही की, जनाबाई आमच्या जवळच्या नातेवाईक आहेत आणि माझ्या वडिलांनी त्यांची जमीन खरेदी घेतली, म्हणून मी त्यांच्या बाजूने साक्ष देत आहे. दाव्यात वादी जनाबाई आहे. पुन्हा सांगतो की, अनुसयाबाई आहे. प्रतिवादी कोण आणि दावा क्रमांक काय हे मला सांगता येत नाही. हे खरे नाही की, साक्षीला चला असे सांगितल्यामुळे मी साक्षीला आलो. हे खरे नाही की, सरतपास खोटा आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
**स्वाक्षरीत/-**
**(एस.एन.सरडे)**

**दिनांक ०४/०५/२०२६.**

**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.**